**निशाणी क्र.२५ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलट तपास आरोपीतर्फे श्री. शेख शकील यांचतर्फे शपथेवर पुन्हा सुरू....**

२. मी व आरोपी भाऊबंद आहोत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व आरोपीच्या वडीलांमध्ये जुना वाद आहे. आरोपीची बायको सुनिता हिने आमच्याविरुध्द फौजदारी प्रकरण दाखल केले होते. त्यामध्ये मी, बळीराम, दत्ता, अनुसयाबाई इत्यादी आरोपी होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावामध्ये गायरानची जागा आहे. आमच्या गावामध्ये मंदीर आहे व त्याच्या बाजुला मठ आहे. तेथे लोक दर्शनाकरीता आल्यानंतर बसत असतात. मी अशिक्षीत आहे. मला फक्त सही करता येते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारीतील मजकुराबाबत मला काही माहिती नाही व तक्रारीवर केवळ पोलीसांनी सांगितले आहे मी सही केली आहे.

**प्रश्नः–** घटणा कधी घडली होती (साक्षीदाराने ती बाब सरतपासात सांगितली असल्याने तो प्रश्न विचारता येणार नाही त्यामुळे नामंजुर करण्यात आला)

हे म्हणणे खरे नाही की, मी नेहमीच न्यायालयात येत असतो. घटणेच्या वेळी घटणास्थळा शेजारी कोण कोण व्यक्ती राहत होते हे मला सांगता येणार नाही. घटणास्थळाशेजारची लोकवस्ती मोठी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे दि.२५.०४.२०१४ रोजी कुठलीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी आरोपीने मला शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने काठीने मला मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझा आरोपीशी जुना वाद असल्याने मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझी पत्नी व मुलगा आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला कधीही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मला जखमच झाली नसल्यामुळे मी दवाखान्यात गेलो नव्हतो. घटनास्थळाच्या उत्तर दिशेने बोकुड जळगाव ते झोपडपट्टीकडे जाणारा रस्ता आहे. आमच्या गावच्या वेशीच्या उत्तर दिशेला मोकळी जागा आहे. त्या ठिकाणी लोकांची वर्दळ असते. हे

म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

GANESH VASANTAPPA GANDHE

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.07.28 17:34:36 +0530

दिनांक – २८.०७.२०२६

**(जी. व्ही. गांधे)**
न्यायदंडाधीकारी, प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.३) पैठण.